**प्रेस नोट**

**इंटरनेट माध्यमाद्वारे रिसॉर्ट, व्हिला, हॉटेल्स, बंगलो बुक करून देण्याचे नावाखाली नागरिकांची ऑनलाईन फसवणूक करणाऱ्या आरोपींना पश्चिम प्रादेशिक सायबर पोलीस ठाणे, गुन्हे शाखा,मुंबई यांचे कडून अटक**

| | | |
|---|---|---|
| १ | पोलीस ठाणे | पश्चिम प्रा. सायबर पोलीस ठाणे, गुन्हे शाखा, गु.अ.वि., मुंबई |
| २. | गुन्हा नोंद क्र. व कलम | ५९/२०२१ कलम ४१९, ४२०, ३४ भादवि सह ६६(क), ६६(ड) मातंका |
| ३ | गुन्हयाचे ठिकाण | ऑनलाईन माध्यमातून फिर्यादी हे११०३, ब्लू माउंटन, शास्त्री नगर, अंधेरी (प), मुंबई ५३ येथे असताना |
| ४ | गु.घ.दि. वेळ | दि. ०६/१२/२०२१ ते दि. २२/१२/२०२१ चे दरम्यान |
| ५ | गु.दा.दि. वेळ | दि. २७/१२/२०२१ रोजी १७.०० वा |
| ६ | फसवणुक झालेली रक्कम | रू. ७२,०००/-रकमेची ऑनलाईन फसवणुक |
| ७ | हस्तगत मालमत्ता | ०३ मोबाईल फोन, ०१ डेबिट कार्ड |
| ८ | अटक आरोपी तपशिल | आकाश रूपकुमार जाधवाणी वय-२१ वर्ष,<br>अविनाश रूपकुमार जाधवाणी वय-२६ वर्ष<br>दोघे राहणार मुंबई. |
| ९ | तपासी अधिकारी | पो.नि.सविता शिंदे/पोउपनि अमित पांडे |

**थोडक्यात हकिगत :**-नविन वर्ष व ख्रिसमस निमीत्ताने नागरिक वॅकेशनसाठी रिसॉर्ट, व्हिलाज, हॉटेल्स बुक करत असतात त्याचा फायदा घेऊन सायबर गुन्हेगारां कडून सोशल मिडीयावर ऑनलाईन बुकिंग साठी जाहिरात प्रसिद्ध केली जाते व त्या माध्यमातून नागरिकांची फसवणूक केली जाते.

अशा प्रकारे फसवणूक झाल्याची तक्रार मुंबई स्थित राहाणारी महिलेने पश्चिम प्रा. सायबर पोलीस ठाणे बीकेसी येथे दि.२७/१२/२१ रोजी दिली होती. सदर महिला तिचे मित्रांसमवेत वर्ष अखेर मुंबई बाहेर साजरा करण्यासाठी भाडे तत्वावर मिळणारे बंगलोज व व्हिलाज यांचा शोध घेत होते. दि. ०६/१२/२०२१ रोजी फिर्यादी यांचे कौटुंबिक मित्र श्री खुराना यांनी इंस्टाग्रामच्या luxury.villas.lonavala यावर लोणावळा, गोवा, अलिबाग या ठिकाणच्या विविध बंगलोज व व्हिलाज भाडयाने देण्याबाबत जाहिरात पाहिली. त्यापैकी त्यांना लोणावळा येथील बंगलो पसंत पडल्याने त्यांनी सदरच्या इंस्टाग्राम खातेधारकास सदर बंगला भाडयाने पाहिजे असल्या बाबत कळविले. त्यावेळी सदर बंगल्याची जाहिरात प्रसिध्द करणा-या इंस्टाग्राम खाते धारकाने त्याचे नाव हार्दिक असल्याचे सांगून सदर बंगला भाडयाने घेणेकरिता रू. ७२,०००/-प्रति दिवस याप्रमाणे भाडे सांगून एकूण भाडयाची रक्कमे पैकी अर्धी रक्कम बुकिंग साठी भरावी लागेल असे सांगितले. फिर्यादी यांना सदर बंगलो हा दोन दिवसां करिता हवा असल्याने त्यांनी रु ७२,०००/-बुकिंग रक्कम हार्दिक याने दिलेल्या बॅंक खात्यावर पाठविली. त्यानंतर हार्दिक याने richfeelhospitality@gmail.com या ईमेल आयडी वरून फिर्यादीयांचे ईमेल आय.डी.वर Mawi Infinity villa या लोणावळा येथील बंगल्याची बुकींग कंन्फर्म झाली असल्या बाबत कळविले. त्यानंतर दि. १९/१२/२०२१ रोजी फिर्यादी यांनी सदर व्हीला चे केअरटेकर शी संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता सदर क्रमांक नॉटरिचेबल आल्याने फिर्यादी व त्यांच्या मित्रांना शंका

आल्याने दि. २२/१२/२०२१ रोजी Mawi Infinity villa.com साईट द्वारे सदर प्रॉपर्टीचे मालकाशी संपर्क साधला असता त्यांनी Richfeel Hospitality बददल काही एक माहितीने असल्याचे सांगितले तसेच इतर आणखी व्यक्तींनी देखिल त्यांचे कडे व्हिला बुकिंग बाबत चौकशी केली असल्याचे सांगितले. त्यावेळी फिर्यादी यांना त्यांची फसवणुक झाल्याचे समजले.

त्यांच्या तक्रारीवरून तात्काळ गुन्हा नोंद क्रमांक ५९/२०२१ कलम ४१९, ४२०, ३४ भादवि सह ६६(क), ६६(ड) माहिती तंत्रज्ञान अधिनियम नोंद करण्यात आला. गुन्हयाचे तांत्रिक विश्लेषणा मध्ये आरोपी स्व:ताचे वास्तव्य सतत बदलत असल्याचे दिसून आले. तात्काळ एक पथक पुणे येथे रवाना करण्यात आले व दोन आरोपींस विमान नगर परिसरातील एका नामांकित हॉटेल मधून दि.२८/१२/२१ रोजी ताब्यात घेण्यात आले. आरोपीकडे केलेल्या प्राथमिक चौकशी मध्ये त्यांनी अशा प्रकारे बऱ्याच नागरिकांची फसवणूक केली असल्याचे दिसून आले असून त्यांचे विरूद्ध महाराष्ट्र राज्यात एकूण १२ गुन्हे दाखल असून यातील नया नगर पोलीस ठाणे, मिरा रोड, मुंबई येथील गु.र.क्र. ४४४/२१ कलम ४२०, ३४ भादविसह कलम ६६(अ), ६६(ड) मातका या गुन्हयां मध्ये ते पाहिजे आरोपी असल्याचे निष्पन्न झाले आहे.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.क्र. व कलम |
|---|---|---|
| १ | पवई पोलीस ठाणे, मुंबई | ६५/२१ कलम ४२० भादवि सह ६६(ड) मातका |
| २ | मलबार हिल पोलीस ठाणे, मुंबई | २१०/२१ कलम ४१९, ४२० भादवि सह ६६(क), ६६(ड) मातका |
| | | २२०/२१ कलम ४१९, ४२० भादवि सह ६६(क), ६६(ड) मातका |
| ३ | डि.बी.मार्ग पोलीस ठाणे | ५५०/२१ कलम ४१९, ४२० भादवि सह ६६(क), ६६(ड) मातका |
| ४ | चुनाभटटी पोलीस ठाणे | ४८९/२१ कलम ४६५, ४६८, ४७१, ४१९,४२०, ३४ भादवि सह ६६(ड) मातका |
| ५ | दादर पोलीस ठाणे | ६५७/२१ कलम ४२०, ४६८, ४७१ भादवि सह ६६(क),(ड) मातका |
| ६ | पिंपरी चिंचवड पो.ठाणे | ४४८/२१ कलम ४२०, ३४ भादवि |
| ७ | नया नगर पो.ठाणे, मिरो रोड, मुंबई | ४४४/२१कलम ४२०, ३४ भादवि सह ६६(अ),६६(ड) मातका |
| ८ | मुलुंड पोलीस ठाणे | ७२१/२०२१कलम ४२०,भादवि सह ६६(ब) मातका |
| ९ | मुलुंड पोलीस ठाणे | ७६२/२०२१कलम ४२० भादविसह ६६(ड) मातका |
| १० | मलबार हिल पोलीस ठाणे, मुंबई | २६६/२०२१ कलम ४१९,४२०,४६५,४६८,४७१ भादवि सह ६६(ड) मातका |
| ११ | खांडेश्वर पोलीस ठाणे | २३५/२०२१ कलम ४२० भादवि सह ६६(ड) मातका |
| १२ | ठाणे नगर पोलीस ठाणे | ११४/२०२१कलम ४२०, ३४ भादवि सह |

सर्व नागरिकांना या द्वारे आवाहन करण्यात येते कि **९६५३११०७५० व ८३९०८६४६७६** या मोबाईल क्रमांकाशी संपर्क साधून ऑनलाईन हॉटेल्स, व्हिला, बंगलो बुकिंग केली असल्यास त्यांनी तात्काळ पश्चिम सायबर पोलीस ठाणे मुंबई येथे संपर्क साधावा तसेच ऑनलाईन हॉटेल्स व्हिलाज बंगलो बुक करताना

सोशल मिडीया पेजेस, वेब साईट अधिकृत असल्याची खात्री करावी तसेच त्यावर देण्यात आलेल्या संपर्क क्रमांकाची खात्री करुनच बुकिंग करावी.

सदरची कारवाई मा.सहपोलीस आयुक्त (गुन्हे) मुंबई श्री.मिलिंद भारंबे, मा.अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. विरेश प्रभु, मा. पोलीस उपायुक्त डॉ. रश्मी करंदीकर (सायबर गुन्हे) मुंबई, सहायक पोलीस आयुक्त श्री. नितीन जाधव (सायबर गुन्हे) यांचे मार्गदर्शना खाली पश्चिम विभाग सायबर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शर्मिला सहस्त्रबुद्धे, म.पोलीस निरीक्षक सविता शिंदे, पोलीस उप निरीक्षक अमित पांडे व पोलीस शिपाई .तकीक, पोलीस शिपाई गवळी यांनी केली.